**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांचा उलटतपास वादीतर्फे विद्वान वकील श्री. ए. एम. निंबुरगे यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरुः–</u>**

११. माझे शिक्षण इयत्ता ९ वी पर्यंत झाले आहे. मी पुर्वी एस.आर.पी.एफ. मध्ये होतो. मी सन १९७८ मध्ये पुणे दौंड येथे नौकरीला लागलो. त्यानंतर माझी बदली सोलापूर व लातूर येथे झाली. मी लातूर येथे पोलीस खात्यात १९९७ साली नौकरीस होतो. सन १९७८ ते १९९७ सालापर्यंत मी माझ्या गावी एक ते दोन महिन्यातुन यायचो.

१२. १९८१ साली आमच्यात वाटण्या झाल्या त्याचा अंमल महसुल दफ्तरी झाला. त्याचा अभिलेख मी याकामी दाखल केला आहे. वडीलांनी जुना सर्वे क्र.३२/ब व नविन सर्वे क्र. ३४/ब स्वत:च्या नावावर ठेवला होता, वडीलानंतर सदर सर्वे क्र.३४/ब वादी व माझ्या नावाने झाला. हे म्हणणे खरे नाही की, वडील वारल्यानंतर सदरचा फेर आमच्या नावाने झाला. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, वडील हयात असताना सदरचा फेर आमच्या नावाने झाला. मी फेर क्र. ६२१ वाचला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा फेर हा आमच्या सन १९८१ मधील वाटणीचा आहे. मला यादी नि.क्र. ४ सोबत अ.क्र. ३ वरिल फेरफार क्र. ६२१ दाखवला असता त्यामध्ये वडीलांच्या पश्चात वादी व माझ्यामध्ये सर्वे क्र. ३२/ब आमच्या दोघात राहिल असे नमुद केलेले आहे. साक्षीदारास फेरफार क्र. ६२१ ची प्रत उलटतपासामध्ये दाखवली असता व त्यातील मजकूर साक्षीदाराने मान्य केला असल्याने त्यास **नि.क्र. १०८** देण्यात येते.

१३. वडीलांच्या मृत्यूनंतर वादी व मी तलाठी यांच्याकडे मृत्यूपत्र घेऊन गेलो व तलाठी यांना आमच्या दोघांचे नाव हक्कामध्ये लावुन घ्यावे व प्रतिवादी क्र. २ चे नाव इतर

हक्कामध्ये लावुन घ्यावे अशी विनंती केली. आम्ही त्यासाठी लेखी अर्ज केला नव्हता. आम्ही तसे मृत्यूपत्राच्या पाठीमागे लिहुन दिले होते. फेरफार क्र. ६२१ प्रमाणे वादी व माझे नाव सर्वे क्र.३२/ब मध्ये लावण्यात यावे असे नमुद असताना प्रतिवादी क्र. २ याचे नाव पुर्वीपासून ७/१२ च्या उता–याला असल्याने त्याचेही नाव इतर हक्कामध्ये लावावे अशी विनंती आम्ही केली. सर्वे क्र.३२/ब चा ७/१२ उतारा (नि.क्र. ९१) मला दाखवला असता त्यामध्ये प्रतिवादी क्र. २ चे नाव नमुद नाही.

१४. मला नि.क्र. ९३ वरिल फेरफार क्र.१०८२ दाखवला असता त्यामध्ये मी लिहीलेल्या अर्जाप्रमाणे माझे वडीलांच्या पश्चात एकत्र कुटूंब कर्ता म्हणुन माझे नाव नविन सर्वे क्र.३४/ब ला लावण्यात यावे असा मजकुर नमुद केला आहे. सदर फेरफार (नि.क्र.९३) मध्ये मी अर्ज केल्याबाबत चुकिचे नमुद केले आहे व त्यातील संपुर्ण मजकूर चुकिचा आहे. फेरफार (नि.क्र.९३) मध्ये चुकिचा मजकूर नमुद केला आहे याबद्दल कोठेही मी आक्षेप किंवा अपील दाखल केले नाही. वडील मयत झाल्यानंतर फेरफार किंवा ७/१२ चे उतारे मी डयुटीवर असल्यामुळे पाहिले नाहीत. सर्वे क्र.३४/ब चा ७/१२ चा उतारा व फेरफार मी तलाठी यांच्याकडे मृत्यूपत्र घेऊन गेलो त्यावेळेस बघण्याचा योग आला. मला आता सर्वे क्र.३४/ब चा ७/१२ उतारा (नि.क्र.९२) दाखवण्यात आला तो मी आज पहिल्यांदाच पाहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये एकत्र कुटूंब कर्ता म्हणुन माझे नाव नमुद आहे व इतर अधिकारामध्ये प्रतिवादी क्र. २ व वादी यांचे नाव नमुद आहे. सर्वे क्र.३४/ब चा ७/१२ उतारा (नि.क्र.९२) मला दाखवला असता त्यामध्ये वहितीच्या रकान्यामध्ये सन १९९५ पासून माझे नाव नमुद आहे. सर्वे क्र.३४/ब चा ७/१२ उतारा (नि.क्र.९५) मला दाखवला असता त्यामध्ये वादीला खरेदीखत करून देण्यापर्यंत वहितीला माझेच नाव नमुद आहे.

१५. नि.क्र.१०८ वरिल फेर क्र. ६२१ मध्ये रस्त्यालगतची जमिन मला व त्याच्या पाठीमागील जमिन वादीला असे नमुद केले नाही. वडीलांच्या पश्चात वादी व मी असे मिळुन

रस्त्यालगतची जमिन मला व त्याच्या मागील जमिन वादीला असा कोणताही दस्त तयार केला नाही. माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. २ मधील मजकुर की, ''*सदर वाटणीनुसार वडील गंगाराम यांनी तलाठी यांना अर्ज देऊन वाटणीनुसार फेर क्र. ६२१ मंजुर करून घेतला होता व सदर फेरफारमध्ये वाटणीचा तपशील नमुद असुन सर्वे क्र.३२/ब (३४/ब) ५ हेक्टर २८ आर हे क्षेत्र वडीलांनी स्वतःच्या नावे ठेवलेल्या जमिनीबाबत वडीलांच्या मृत्यूनंतर ती जमिन वादी व माझ्यात वाटली जावी याचाही स्पष्ट उल्लेख आहे. तसेच वाटणीच्यावेळी असे ठरले होते की, गंगाराम यांच्या मृत्यूनंतर त्यांनी स्वतःची ठेवलेली शेतजमिन सर्वे क्र.३४/ब ही वादी व माझ्यामध्ये वाटली जाईल तर गावालगत असलेली नामदेव चिलमे यांच्या शेजारील जमिन ही अंगद(प्रतिवादी क्र.२) यास राहिल''* हा मजकुर बरोबर आहे.

१६. मी तलाठी यांच्याकडे फेर क्र. १०८२ (नि.क्र.९३) करण्यासाठी अर्ज दिला नाही. प्रतिवादी क्र. २ चे सर्वे क्र.३४/ब मधील क्षेत्राशी कोणताही संबंध नव्हता. मी प्रतिवादी क्र. २ चे नाव इतर हक्कामध्ये लावण्यासाठी तलाठी यांच्याकडे अर्ज केला नाही, प्रतिवादी क्र. २ चे नाव पुर्वीपासूनच इतर हक्कामध्ये होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ३ मध्ये प्रतिवादी क्र. २ याचा सर्वे क्र.३४/ब मधील क्षेत्राशी कसलाही संबंध नाही असे चुकिचे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी व मी मृत्यूपत्र घेऊन तलाठी यांच्याकडे गेलो होतो. तलाठी यांनी फेर घेण्यापुर्वी नोटीस काढली नाही. फेर घेतल्यानंतर मी ७/१२ ची पडताळणी केली. त्यानुसार माझे नाव मालकी रकान्यात घेण्यात आले व वादी व प्रतिवादी क्र. २ चे नाव इतर हक्कात घेण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा फेर माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. २ मधील मजकूराप्रमाणे झाला नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सदरचा फेर तलाठी यांच्या चुकिमुळे झाला. त्याबाबतचे अपील मी केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी

सदरचा फेर मुद्दाम केला.

प्रश्नः– वादी व तुमच्यामध्ये सर्वे क्र.३४/ब च्या वाटणी संदर्भात कोणासमक्ष ठरले ?

उत्तरः– वादी व माझ्या संमतीने सर्वे क्र.३४/ब च्या वाटणी संदर्भात ठरले.

त्या वाटणी संदर्भात कोणताही दस्त तयार करण्यात आला नाही.

१७. जमिन सर्वे क्र.३४/ब च्या उत्तरेकडून शेजारी सुवर्णा चिलमे आहेत. ललिता नारायण पंडगे, अनुजा गंगाधर निलापल्ले हे जमिन सर्वे क्र. ३४ ब च्या उत्तर बाजुला सुवर्णा चिलमे यांच्या जमिनीच्या पश्चिमेकडील शेजारी आहेत. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, ललिता नारायण पंडगे यांची जमिन सर्वे क्र. ३४/ब च्या उत्तरेला लागुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी वादीच्या हक्कात खरेदीखत (नि.क्र.८७) करून दिले आहे. खरेदीखत (नि.क्र.८७) नुसार १ हेक्टर १२ आर पैकी मी २ एकर ३१ गुंठे पश्चिमेकडील जमिन मी वादीस दिलेली आहे. खरेदीखत (नि.क्र.८७) मध्ये ठरावाच्या दिवशी जमिनीचा ताबा वादीस दिलेला आहे व पुर्वीच रक्कम रूपये १,०१,०००/– वादीकडून मला मिळाली आहे असे चुकिचे नमुद केलेले आहे. खरेदीखत (नि.क्र.८७) स्वतः वादीने तयार केलेले आहे. खरेदीखत (नि.क्र.८७) चा दस्त राजाराम गोविंदराव माळी यांनी लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, या खरेदीखत (नि.क्र.८७) ला प्रतिवादी क्र. २ यांनी संमती दिलेली आहे. प्रतिवादी क्र. २ चे ७/१२ उता–यामधील इतर हक्काच्या रकान्यातील त्याचे नाव कमी करण्यासाठी त्याची संमती घेण्यात आली. प्रतिवादी क्र. २ चे नाव त्यानुसार ७/१२ च्या उता–यामध्ये इतर हक्काच्या रकान्यातुन कमी झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसेच वादीचे ही नाव ७/१२ च्या उता–यामधील इतर हक्काच्या रकान्यात तसेच राहिले. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र.६२१ (नि.क्र.१०८) अनुसार वादीचा अर्धा हिस्सा असल्याने सर्वे क्र.३४/ब च्या ७/१२ च्या उता–यात इतर हक्काच्या रकान्यातुन वादीचे नाव कमी करण्यात आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखत (नि.क्र. ८७) च्या

अनुषंगाने वादीचे नाव सर्वे क्र.३४/ब च्या ७/१२ च्या मालकी हक्काच्या रकान्यात नमुद करण्यात आले.

प्रश्न: असा कोणता दुसरा दस्त होता ज्याचा खर्च खरेदीखत (नि.क्र.८७) पेक्षा जास्त येत होता ?

उत्तर: मला सदर दस्ताचे नाव सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, मुद्रांक शुल्क जास्त लागत असल्याने खरेदीखत (नि.क्र.८७) करण्यात आले होते.

१८. जबाब दावा दाखल करण्याच्या वेळेस मी माझ्या वकिलांना इतर दस्त तयार करण्यासाठी जास्त मुद्रांक शुल्क लागतो म्हणुन खरेदीखत करण्यात आले असे सांगितले होते. तसे माझ्या जबाब दाव्यामध्ये नमुद नाही तरी मी ते आत्ता सांगत आहे. जबाब दाव्यातील मजकूर मी सांगितल्याप्रमाणे लिहीण्यात आलेला आहे ते बघुन मी त्यावर सही केलेली आहे.

१९. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत (नि.क्र.८७) माझ्या सांगण्याप्रमाणे तयार करण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, लिहुन देणार हा दस्ताची संपुर्ण माहिती सांगत असतो. जमिन विक्री करणारा मालक जमिनी संदर्भातील माहिती लिहुन देणार म्हणुन सांगत असतो. हे म्हणणे खरे आहे की, जमिन मालकांनी दिलेल्या माहिती अनुसारच खरेदीखताचा दस्त तयार करण्यात येतो व तो नोंदणीकृत करण्यात येतो.

२०. वादीच्या हक्कात खरेदीखत (नि.क्र.८७) करून दिल्यानंतर वादीचे नाव सर्वे क्र.३४/ब च्या ७/१२ च्या उता–यातील इतर हक्काच्या रकान्यातुन कमी करण्यासाठी हक्कसोड पत्र (नि.क्र.८८) करून घेतले होते. सदरचे हक्कसोड पत्र (नि.क्र.८८) दि.२९/०२/२०१६ रोजी करण्यात आले होते. मला कर्ज मिळत नव्हते म्हणुन मी इतर

वर्षांनी सदरचे हक्कसोड पत्र तयार करून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, हक्कसोड पत्रामध्ये (नि.क्र.८८) मला कर्ज मिळत नव्हते म्हणुन वादी व प्रतिवादी क्र. २ चे नाव कमी करण्यासंदर्भात नमुद केले होते. हक्कसोड पत्र (नि.क्र.८८) मला दाखवले असता त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. हक्कसोड पत्र (नि.क्र.८८) मी तयार करण्यास दिला होता. यातील संपुर्ण मजकूर मी सांगितला होता. हक्कसोड पत्र (नि.क्र.८८) मध्ये वादी व प्रतिवादी क्र. २ चे हक्क आहेत असे नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीला खरेदीखत (नि.क्र.८७) स्वतंत्र करून दिलेले आहे.

(न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब. )

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2026.02.17 11:54:07 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–१६.०२.२०२६. दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.